Beed | DAILY | MARATHI | Year-03 | Issue -308 | FRIDAY DT.09 FEBRUARY 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

बीड | दैनिक | मराठी | वर्ष –०३ | अंक –३०८ | शुक्रवार,दि.०९ फेब्रुवारी २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२१/८००७४ | । किंमत ३ रू | । पाने ४




दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# महाराष्ट्रात गुन्हेगारीचा कळस

## ठाकरे गटाच्या नगरसेवकाचा चालु मुलाखतीत खुन, धारूरमध्ये पोटच्या मुलीवर बापाचा अत्याचार, परळीत युवकाचा घातपात करून मृतदेह टायरखाली फेकला?

धारूर पोलीस स्टेशन हद्दीतील अंबाजोगाई तालुक्यातील उमराई येथील बाळू गायकवाड ४१ वर्षीय नराधमाने आपल्या पोटच्या मुलीवर दारू पिऊन , मारहाण करत अत्याचार केला त्यात मुलगी गर्भवती जाली असून या अत्याचाराची माहिती आईला दिली या प्रकरणी धारूर पोलीस स्टेशन येथे आरोपी बाळू गायकवाड विरुद्ध मुलीच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद झाला आहे पुढील तपास पोलीस करत आहेत



अंबाजोगाई तालुक्यातील उमराई येथे दारुड्या बापाकडून मुलगी गर्भवती राहिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत अधिक ची माहिती उमराई येथे गायकवाड कुटुंब हे मोलमजुरी करून आपल्या कुटुंब चालवते विशेष म्हणजे हे कुटुंब ऊसतोड कामगार म्हणून इतरत्र कारखान्याला जाऊन आपला उदरनिर्वाह करत असते या यावर्षी अंबाजोगाई तालुक्यातील रांजणी कारखान्याला हे कुटुंब ऊसतोड कामगार म्हणून गेले होते त्या ठिकाणी काम करत असताना मुलीच्या अचानक पोटात दुखू लागल्याने तिला आईला सांगितले असता तिच्या आईने तिला अंबाजोगाई येथे सहा फेब्रुवारी मंगळवार रोजी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर मुलगी गर्भवती असल्याचं सांगून मुलीला रुग्णालयातील प्रसूती वार्डामध्ये ऍडमिट होण्यासाठी सांगितल्यानंतर त्यांच्याकडे कपडे किंवा कोणत्याच वस्तू उपलब्ध नसल्याने मुलगी आईसह ऊस तोडणीच्या ठिकाणी खोपी मध्ये रात्र काढून दुसर्या दिवशी सात फेब्रुवारी बुधवार रोजी परत रुग्णालयात येऊन प्रसूती वार्डामध्ये दाखल झाली.यावेळी अधिक चौकशी केल्यानंतर मुलीने वडिलांनीच मागील आठ महिन्याखाली राहत्या घरी आई बाहेर गेल्यानंतर दारू पिऊन अनेक वेळा मारहाण करत अत्याचार केल्याची आपबिती कथन केली यानंतर मुलीच्या फिर्यादीवरून वडील बाळू गायकवाड यांच्या विरोधात अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली चिडीमार पथकाचे पोलीस उपनिरीक्षक प्रकाश सोळंके करत आहेत.

परळी : विटभट्टीवरील पाण्याच्या टँकरवर चालक म्हणून कामाला असलेल्या ३० वर्षीय तरुणाचा मृतदेह रात्री टँकरच्या चाकाखाली आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. चालक सकाळी डब्बा घेऊन कामावरगेला होता. रात्री उशिरापर्यंत घरी आला नसल्याने त्याचे नातेवाईक त्याचा शोध घेत होते, मात्र सदरील चालकाचा मृतदेह चाकाखाली आढळून आल्याने हा अपघात आहे की घातपात? असा प्रश्न उपस्थित होत आहे. चालकाचा खून केल्याचा आरोप मृताच्या नातेवाईकांनी केला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत.



आकाश सुरेश रोडे (वय ३० वर्षे रा. टोकवाडी) हा विटभट्टीवरील पाण्याच्या टँकरवर चालक म्हणून कार्यरत होता. काल सकाळी तो घरी येऊन डबा घेऊन कामावर गेला होता.

## द्रौपदीबाई गायकवाड यांचे पुत्र विरहात अल्पशा आजाराने निधन

माजलगाव (प्रतिनिधी)

तालुक्यातील नित्रुड येथील जेष्ठ नागरिक द्रौपदीबाई भगवानराव गायकवाड (७०) यांचे माजलगाव येथील संजीवनी हॉस्पीटल मध्ये अल्पशा आजाराने गुरुवार दि०८ फेब्रुवारी रोजी पहाटे ०२.४५ वाजता दुःखद निधन झाले. तीन महिन्यांपूर्वी त्यांचा मुलगा दिवंगत ग्रामसेवक गणेश गायकवाड यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले होते.

या पुत्र विरहातून त्या बाहेर न निघाल्याने काल त्यांची प्राणज्योत मालवली. गुरुवारी सकाळी अकरा वाजता नित्रुड येथील शेतात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन सुना, नातवंडे असा परिवार आहे. माझी पंचायत समिती सभापती दिनेश गायकवाड यांच्या त्या आई होत.



## मुंबई मध्ये सभापती अशोक डक यांचा मनोज जरांगे पाटलांकडून सत्कार

माजलगाव (प्रतिनिधी)

मराठा आरक्षणाच्या आंदोलनात मनोज जरांगे पाटील यांनी बीडच्या इशारा सभे मध्ये २० जानेवारी मुंबईकडे उपोषणासाठी पायी मोर्चा काढण्याचा निर्णय जाहीर केला होता. या मोर्चा दरम्यान अंतरवाली ते वाशी प्रवासाच्या दरम्यान अनेक मराठा बांधवांनी सेवा केली. या सर्व बांधवांचे ठिकठिकाणी सत्कार होत आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी ६ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी तारखेपर्यंत महाराष्ट्राच्या अनेक शहरांमध्ये दौरे केले आहेत.दि ०७ फेब्रुवारी बुधवार रोजी नवी मुंबई येथे सकल मराठा समाजाच्या वतीने नेरूळ या ठिकाणी नवी मुंबईमध्ये मराठा बांधवांनी या मोर्चासाठी मदत केली त्यांचा सत्कार करण्यात आला.

नवी मुंबई सारख्या ठिकाणी लाखो मराठा बांधवांनी व्यवस्था करणे कठीण असताना मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी सर्व आंदोलकांची राहण्याची व जेवण्याची व्यवस्था करण्यात आली. अचानक वाशी या ठिकाणाचा एक दिवसाचा मुक्काम वाढला परंतु सभापती व नवी मुंबई सकल मराठा समाजाच्या वतीने व्यवस्था करण्यात आली. महत्वाची गोष्ट म्हणजे अगदी मुंबईच्या वेशीवर वाशी या ठिकाणी मनोज जरांगे पाटलांच्या सर्व मागण्या मान्य केल्या व सगे सोयरे ही संज्ञा २००१ च्या कायद्यात नव्याने समावेश करण्यासंदर्भात अधिसूचना काढून हे आंदोलन थांबवले. या सर्व आंदोलनामध्ये वाशी या ठिकाणी दोन दिवस केलेल्या व्यवस्थे मध्ये सगळ्यात जास्त महत्त्वाची भूमिका बजावणारे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सर्व संचालक मंडळ आणि सर्व पदाधिकारी कर्मचारी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल सभापती अशोक डक, संचालक आमदार शशिकांत शिंदे व सचिव यांचा सत्कार करण्यात आला.

### बीड मध्ये ही होणार सत्कार,सीए.बी.बी. जाधव


वाशी या ठिकाणी आंदोलकांची उत्कृष्ट व्यवस्था केल्याबद्दल सकल मराठा समाज बांधव सभापती अशोक व सर्व संचालकांचा ऋणी आहे. बीड जिल्हा सकल मराठा समाजाच्या वतीने आयोजित जाहीर कार्यक्रमात यांचा सत्कार केला जाणार असल्याचे सीए.बी.बी. जाधव यांनी सांगितले.



## उपळी,सोन्ना खोटा येथील मध्यम प्रकल्या मधुन पाणी उपसा सुरुच

संभाजी लांडे ।वडवणी

वडवणी तालुक्यात यावर्षी अल्प पाऊस पडल्यामुळे तालुक्यात असलेले दोन मध्यम प्रकल्प व चार लघु प्रकल्प तसेच छोटे मोठे साठवण तलाव ही भरले नाहीत.त्यामुळे विहीर बोअर यांच्या पाणी पातळीतही वाढ होऊ शकली नाही परिणामी वडवणी तालुक्यात हिवाळ्यातच पाणीटंचाईच्या झळा जानवू लागल्या असताना उपळी येथील कुंडलिका व सोन्ना खोटा येथील उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्पातुन चोही बाजूने विद्युत मोटारीच्या साह्याने दिवस–रात्र पाण्याचा उपसा चालू असून याकडे तालुका प्रशासन व लघु पाटबंधारे विभाग आणि विद्युत विभाग मात्र लक्ष देत नाही यामुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणात प्रकल्पातून पाणी उपसा चालू असून याचा फटका उन्हाळ्यात बसणार आहे.



एकीकडे पाणी टंचाईवर मात करण्यासाठी उपाय योजना आखल्या जात आहेत तर दुसरीकडे आहे त्या पाणीसाठ्याचे प्रशासना कडून योग्य नियोजन होत नसल्यानेच अवैध पाणी उपसा होत आहे तसेच अवैध पाणी उपसा करणाऱ्या वर कारवाई करण्यासाठी नेमलेले पथक केवळ कागदावरच असून हे पथक हप्ते खोरी मुळे कारवाया करत नसल्याचे बोलले जात आहे पाणी उपसा करणाऱ्या वर कारवाया होणार नसतील तर उन्हाळ्यात भिषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागनार

वडवणी तालुक्यात दोन मध्यम प्रकल्प व चार लघु प्रकल्प आहेत तसेच गाव साठवण तलावही आहेत परंतु यातील एकही प्रकल्प आणि तलाव यावर्षी पूर्ण क्षमतेने भरलेला नाही.

## पाटोद्यात राष्ट्रवादीचा आज युवक आनंदोत्सव मेळावा व भव्य रॅली

पाटोदा (प्रतिनिधी)

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षबांधणी करण्यासह कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी पाटोद्यात आज शुक्रवार (दि.९) रोजी राष्ट्रवादी युवक आनंदोत्सव मेळावा व भव्य रॅलीचे आयोजन करण्यात.यात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादीचे युवक जिल्हाध्यक्ष विजयसिंह उर्फ बाळा बांगर यांनी केले आहे.



पाटोद्यात राष्ट्रवादीच्या वतीने 'राष्ट्रवादी युवक आनंदोत्सव मेळावा' व भव्य रॅली आज शुक्रवार (दि.९) रोजी आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगर पंचायत कार्यालयापर्यंत ही रॅली निघणार आहे.तर ठीक सायंकाळी सात वाजता नगर पंचायत समोर युवक आनंदोत्सव मेळावा पार पडणार आहे. या मेळाव्याला राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती राहणार आहे.दरम्यान यात अधिकाधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन राष्ट्रवादीचे युवक जिल्हाध्यक्ष विजयसिंह उर्फ बाळा बांगर यांनी केले आहे.

### वडवणी येथील सुरज पेट्रोल पंपावर चोरीचा प्रयत्न

## चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

### चोरट्यांनी पंपावरील कर्मचाऱ्यास मारहाण करत मोबाईल पळवला

संभाजी लांडे ।वडवणी

मंगळवारी रात्रीच्या ११:४० च्या सुमारास बीड परळी हायवेवर असलेल्या सुरज पेट्रोल पंपावर वडवणी शहरा कडून अज्ञात तीन चोरटे मोटरसायकल मध्ये पेट्रोल भरण्याच्या बहाण्याने पंपावर आले या तिन्ही चोरट्यांनी तोंडाला रुमाल बांधला होता तसेच एका चोरट्याच्या हातात धारदार संत्तुर होता तर दुसऱ्या चोरट्याच्या हातात कत्ती होती पंपावर पेट्रोल भरण्यासाठी ड्युटीवर असलेल्या लखन जाधव यास संत्तूर व कत्ती चा धाक दाखवत खिशातील पैसे काढ असे म्हणत मारहाण केली व लखन जाधव यांच्या खिशातून रेड्मी नोट ११ कंपनीचा मोबाईल जबरदस्तीने काढून घेतला. नंतर चोरटे पेट्रोल पंपाच्या कॅश रूम कडे लखन यास घेऊन गेले. पंपावरील दुसरा कर्मचारी कृष्णा चव्हाण कॅश रूममध्ये होता.लखन जाधव यास कृष्णा चव्हाण याला कॅश रूम उघडण्यास सांगितले परंतु कृष्णा याने रूम न उघडल्याने त्या चोरट्यांनी लखन जाधव यास दगडाने मारहाण केली आणि तिन्ही चोरटे विना नंबरच्या शाहीन गाडीवरून पंपावरून निघून गेले. कृष्णा चव्हाण याने कॅश रूम न उघडल्याने चोरट्यांचा दरोडा टाकण्याचा प्रयत्न फसला. काही दिवसापूर्वीच वडवणी जवळील



बाह्येगव्हाण येथील पंकज पेट्रोल पंपावर ही चोरीची घटना घडली होती चोरट्यांनी डिझेलच्या टाकी मधून जवळपास १६००लिटर डिझेलची चोरी केली होती त्यानंतर काही दिवसातच सुरज पेट्रोल पंपावर ही चोरट्यांनी दरोडा टाकण्याचा प्रयत्न केला आहे.लखन जाधव याच्या फिर्यादीवरून वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे.

# संदर्भित रुग्णात वाढ ग्रामीण रुग्णालयाचे नियोजन ढासळे

## ग्रामीण रुग्णालयातील रिक्त जागा रुग्ण मेल्यावर भरणार का?

धारूर (प्रतिनिधी)

शहरांमध्ये तालुक्यातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न सोडवण्यासाठी ग्रामीण रुग्णालय रुग्ण सेवा करते पण धारूर रुग्णालयात डॉक्टर कर्मचाऱ्यांचा अभाव आसुन त्यातली त्यातली त्यात जे डॉक्टर कर्मचारी आहेत तेही काम करत नसल्याने अंबाजोगाई येथे रोजच संदर्भित (रेपर) पेशंट पाठवत आहेत यामुळे गर्भवती रुग्णासह इतर रुग्णांची मोठी हेळसांड होऊन नाहक त्रास सहन करावा लागतोय तसेच या समस्या सोडवणार कोण असा प्रश्न तालुक्यातील नागरिकांना पडला आहे तरी यात वरिष्ठांनी लक्ष घालून तात्काळ बिघडलेली रुग्ण सेवा सुरळीत करावी अशी मागणी नागरिक करत आहेत. धारूर येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये नागरिक मोठ्या संख्येने रुग्ण सेवेसाठी जातात पण रुग्णसेवा लांबच नाहक त्रास सहन करावा लागतो अगोदरच बस स्थानक व गावापासून दोन किलोमीटर अंतरावर रुग्णालय असून लहान बाळाचे डोस,गर्भवती महिला मोठ्या संख्येने ग्रामीण रुग्णालयाचा आधार घेतात पण त्यासाठी ऑटो रिक्षा घेऊन जायचं म्हटलं तर आर्थिक नुकसान त्यात डॉक्टर कर्मचारी नसल्यास पुन्हा डबल हेल्पटा होतो. त्यामध्ये रुग्ण हातबल होऊन खाजगी दवाखान्याचा सहारा घ्यावा लागतो.तसेच विवाह नोंदणी, वयाचा दाखला देण्यासाठी अधिकच्या पैशाची तेथील कर्मचारी




मागणी करत असल्याची तक्रारी वाढल्या आहेत.ग्रामीण रुग्णालयामध्ये स्त्री रोग तज्ञ असतानाही मोठ्या संख्येने संदर्भित (रेपर) गर्भवती महिलांना केले जाते. त्यामुळे गर्भवती मुलांची हेअर स्टाईल होते त्यात जीविताला धोकाही निर्माण होऊ शकतो आरोग्याच्या समस्या वाढू शकतात पण याकडे दुर्लक्ष ग्रामीण रुग्णालय धारूर करत आहे.

### ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी करतात आर्थिक लूट ; गर्भवती महिलांची हेळसांड कधी थांबेल ?

धारूर ग्रामीण रुग्णालयात स्त्री रोग तज्ञ आहेत रुग्णालयातून संदर्भित (रेफर) पेशंटची संख्या वाढली आहे. तरी यासाठी एक समितीची स्थापना केली आहे. या समितीमध्ये संदर्भित (रेपर) केले व का केले यासाठी चौकशी केली जाईल व यापुढे गर्भवती व इतर ही रुग्ण सेवा धारूर ग्रामीण रुग्णालयात देऊ. तसेच विवाह नोंदणी, वयाचा दाखला यासह इतर प्रमाणपत्रासाठी कर्मचारी अतिरिक्त पैसे घेत असतील तर त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल

**प्रसाद कुलकर्णी वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय, किल्ले धारूर**

### धारूर तालुक्यातील नागरिक करत आहेत गर्भवती महिलेची हेळसांड कधी थांबेल ?

अधिकचे पैसे घेणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई कधी होईल... येथील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा आहेत जे आहेत कर्मचारी तेही वेळेवर येत नाहीत. तसेच तेथील कर्मचारी कामासाठी गेलेल्या नागरिकांची अधिक पैसे घेऊन लूट करतात. गर्भवती महिलांना नॉर्मल प्रसूती होत असतानाही अंबाजोगाई येथे सतत संदर्भित (रेफर) केले जाते. अंबाजोगाई येथील डॉक्टर या गोष्टीला कंटाळून गेले आहेत. यामध्ये गर्भवती महिला, जन्मला येणाऱ्या बाळ यांना जीवितास धोका होऊ शकतो. अनेकदा रस्त्यामध्ये प्रसूती झाल्याच्या घटना घडल्या आहेत मग ग्रामीण रुग्णालयात प्रसूती का करत नाहीत. संबंधित डॉक्टर व जे कर्मचारी आधीक चे पैसे घेऊन लूट करतात आशा कर्मचाऱ्यावर कडक कारवाई केली पाहिजे नसता येणाऱ्या काळामध्ये मोठे आंदोलन करू.

**–विश्वास शिनगारे**
सामाजिक कार्यकर्ते

## संपादकीय

# आयुष्यातील परिसस्पर्श

'अन्याय सहन करणाऱ्याला त्याची जाणीव झाल्याशिवाय तो बंड करून उठणार नाही'अगदी हाच धागा पकडून बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण मराठवाडा आणि महाराष्ट्रातील विविध शैक्षणिक संस्थेतील सर्व शिक्षक बांधवांना सोबत घेऊन एका संघटनेची बांधणी करणे वाटते तितके सोपे मुळीच नव्हते. आयुष्यातील एकंदरीत ५० ते ५५ वर्ष अहोरात्र संघटनेचे कार्य अगदी घरादाराचा कसलाही विचार न करता प्रत्येक शिक्षकाच्या मनामनात संघटना रुजवण्याचे कार्य अगदी बिनदिक्कत करणारे आदर्श शिक्षक,कुशल संघटक व संयमी नेतृत्व म्हणजेच आमचे,तुमचे, आपले सर्वांचेच आदरणीय तात्या अर्थात शिक्षण महर्षी द.बा.घुमरे सर.

ज्या काळात संस्थेतील शिक्षकांत संस्था चालकाच्या समोर उभे राहण्याची हिंमत नसे त्या काळात शिक्षकांसाठीच्या न्याय्य हक्कासाठी अगदी कोणासाठीही,कोणत्याही कार्यालयात पोटतिडकीने परंतु अतिशय सभ्य व नम्रपणे प्रश्नाची सोडवणूक आग्रहीपणे करण्याची कसोटी फक्त आणि फक्त तात्यांकडेच होती.अशी निसर्गदत्तक्षमता फक्त काही दैवी व्यक्तींनाच लाभत असते.

तात्यांच्या जीवन प्रवासाचा विचार करता केवळ असामान्य व्यक्तीचेच असे जीवन असू शकते. गरीब,शेतकरी कुटुंबातील जन्म तत्कालीन खडतर व हालाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेऊन उदरनिर्वाहासाठी प्राप्त केलेली शिक्षकाची नोकरी मात्र एक अत्यंत हुशार,सर्वगुणसंपन्न शिक्षक म्हणून अध्यापनासोबतच शैक्षणिक क्षेत्रातील आवड, अन्यायाची चीड व न्यायासाठीची तगमग ही गोष्ट त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती.त्यासाठी त्यांनी आयुष्य अगदी शेवटच्या क्षणापर्यंत पणाला लावले. शिक्षण क्षेत्रातील कोणत्याही घटकाचा कसलाही प्रश्न असला की समोर एकच चेहरा दिसायचा तो म्हणजे तात्यांचा ही तत्कालीन सत्य परिस्थिती होती.

'नसेल सोबती कोणी माझ्या तरी शिक्षक कल्याणासाठी रोज झगडतो मी' या वाक्याला साजेसेच अगदी सकाळपासून ते रात्रीपर्यंत प्रत्येक ऑफिसला त्यांची पायपीट असायची. त्यामुळे संपर्कातील प्रत्येक शिक्षक भारावून जायचा व जोभी उनसे मिला हम उन्ही के हो गए या उक्तीप्रमाणे अगदी तात्यांचा अनुयायीच व्हायचा हे त्रिवार सत्य आहे. तात्यांना शोधण्याची गरजच पडत नसेल तात्या कुठल्याही ऑफिसमध्ये दिवसभर असायचे.

मला लाभलेल्या तात्यांनी शिक्षकाला कधीही कर्मचारी न मानता स्वकुटुंबातील सदस्याप्रमाणेच वागणूक दिली त्याच विचारांचा वसा आणि वारसा घेऊन त्यांचे दोन्ही सुपुत्र दीपकदादा व प्रदीपभाऊ यांनी तात्यांचे संस्कार अगदी सार्थ ठरवले आहेत.त्यांच्यापुढेही काकणभर सरसच अशी शैक्षणिक,सामाजिक,राजकीय, क्षेत्रात एक स्वतःच वलय निर्माण केले असून समाजासमोर आदर्श अशी एक संस्था नावारुपाला समोर आहे.

शिक्षण महर्षी द.बा.घुमरे अर्थात आपले तात्या प्रश्न सामाजिक असो की शिक्षक,शिक्षकेतरांचा, संस्थेचा,शैक्षणिक धोरणांचा कोणताही प्रश्न शासन दरबारी कसा कोठे कधी मांडून तो सोडवूनच कसा घ्यावा ही जादू फक्त तात्यांकडेच होती.आणि हे सर्व लीलया पार पाडणारे अजब रसायन म्हणजे तात्या,म्हणूनच महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रातील इतिहासात आपले नाव सुवर्ण अक्षराने लिहिले जाईल असे कर्तुत्व त्यांचे होते.

आजही दीपकदादांना शैक्षणिक, सामाजिक,राजकीय क्षेत्रातील लाभलेली दूरदृष्टी तात्यांची संस्कार शिदोरी आहे असे ते म्हणतात.तात्यांच्या सहवासातून नीटनेटकेपणा,कर्तव्यदक्षता, समयसूचकता,वक्तशीरपणा आणि महत्त्वाचे म्हणजे आपल्या बांधवांना गुणदोषासह सोबत घेऊन प्रगतीपथावर वाटचाल करणे या सर्वगुणसंपन्न देवदूताचा म्हणजेच आदरणीय तात्यांचा आम्हा भालचंद्र परिवारातील प्रत्येकास लाभलेला सहवास हा आमच्या जीवनाला झालेला एक परिसस्पर्शच होय हे कदापी विसरून चालणार नाही. तात्यांचा हा सहवास दिल्याबद्दल परमेश्वराचे लाख लाख धन्यवाद.

तरकसबंद अनंत उद्धवराव युसुफवडगाव माध्य.व उच्च माध्य. विद्यालय युसुफवडगाव ता. केज जि.बीड

# बाबुजी आव्हाड महाविद्यालय मध्ये एडस जाणीव जागृती पथनाट्य सादर



आज दिनांक ८/५/२०२४ रोजी जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण विभाग जिल्हा रुग्णालय,अहमदनगर व राष्ट्रीय सेवा योजना विभाग बाबुजी आव्हाड महाविद्यालय पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने एडस् जाणीव जागृती पथनाट्य कार्यक्रम महाविद्यालय परिसरामध्ये घेण्यात आला.जयहिंद लोककला मंचचे मा.हमीद सय्यद व त्यांच्या सहकाऱ्यांनी बाबुजी आव्हाड महाविद्यालय मध्ये हा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.बी.ए.चौरे,राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.अरुण राख प्रा. आनंद घोंगडे डॉ. अभिमन्यू ढोरमारे डॉ.अशोक कानडे डॉ.अशोक डोळस प्रा. डि . डी.पालवे, प्रा.ब्रह्मानंद दराडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय,पाथर्डीचे मा.रवी भोईटे व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सर्व स्वयंसेवक- स्वयंसेवीका- यांनी सहभाग घेतला.

# मोबाईल चोरून पळणारे दोन चोरटे पकडले !

माजलगाव (प्रतिनिधी)

शहरात मोबाईल चोरट्यांचा सुळसुळाट सुरू आहे. त्यात बसस्थानकात चोरट्यांचे जणू माहेर घरचं बनले असून पोलिसांना हे चोरटे गावात नव्हते. मात्र दि ०८ फेब्रुवारी गुरुवार रोजी शहर पोलिसांनी गस्तीवर असताना दोन चोरट्यांना बसस्थानकात मोबाईल चोरून पळ काढताना नागरिक व पोलिसांनी पकडले.

याबाबत अधिक माहिती अशी की, दि.८ फेब्रुवारी गुरुवार रोजी माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सोनटक्के,पोलीस नाईक,गौतम गायकवाड,पोलीस शिपाई रामहारी उघडे हे माजलगाव बस स्थानक परीसरात गस्त करत होते.यावेळी माजलगाव बसस्थानकातून दोन चोरटे एका प्रवाशाचा मोबाईल फोन चोरी करुन त्यांच्या मोटार सायकलवरुन पळून जात होते, तितक्यात पोलीसांनी व नागरीकांनी सदर दोन चोरांना पकडले व प्रवाशाने सांगीतल्याप्रमाणे चोरटयांची झडती घेतली असता एका चोराकडे प्रवाशाचा चोरलेला मोबाईल फोन सापडला १) अक्षय धर्मेंद्र मोरे (वय २३ वर्षे), २) शाम अशोक गोळेकर (वय २२ वर्षे) दोन्ही रा. पुरुषोत्तमपुरी ता. माजलगांव असे आहेत. वरील चोरटे रेकॉर्डवरील अट्टल गुन्हेगार असुन त्यांचे विरुध्द यापुर्वी पोलीस स्टेशनला विविध गुन्हे दाखल आहेत. चोरटयांकडून फिर्यादी नामे सय्यद समीर सय्यद इसाक रा.पात्रुड ता. माजलगाव यांचा चोरलेला रेड मी कंपनीचा मोबाईल फोन,किंमत १५,०००/- व चोरट्यांनी गुन्हयात वापरलेली होंडा कंपनीची शाईन मोटार सायकल जीची किंमत ७०,०००/- असा एकुण ८५,०००/- मुद्देमाल चोरटयांकडुन जप्त करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असुन त्यांना उद्या न्यायालयात रिमांड कामी हजर केले जाणार आहे. नमुद चोरटयांकडुन आनखी काही गुन्हे उघडकीस येण्याची दाट शक्यता आहे

# स्वामी शंकरानंद महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी

## हजारो भाविकांनी शंकरानंद मठ गजबजला

माजलगाव (प्रतिनिधी)

सद्गुरू माधवानंद महाराज उमरखेड यांचे पुण्यतिथीनिमीत्त शंकरानंद मठ येथे सकाळी मठावर आगमण झाल्यानंतर १५१ महिलांच्या वतीने पुष्पवृष्टी करत त्यांचे स्वागत केले व महाराज आल्यानंतर महाराजांसमोर २५० महिलांनी सामुदायिक तुकामाई पारायण भक्तीमय वातावरणात संपन्न केले. आज पुण्यतिथीनिमीत्त संपुर्ण दिवस शंकरानंद मठावर धार्मीक कार्यक्रमांची रेलचेल होती.

पारायण झाल्यानंतर महाराजांचा यथोचित सत्कार, सन्मान समितीच्या वतीने करण्यात आला. याठिकाणी अयोध्या येथे राममंदिर प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी गेलेल्या वे.शा.सं. अक्षय रत्नपारखी, राजु गुंजकर, दिवाकर रामदासी या पूरोहितांचा सत्कार करण्यात आला तसेच एमपीएससी उत्तीर्ण क्षितीज उमेश मोगरेकर यांचा महाराजांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मठामध्ये ब्रम्हवृंदाच्या उपस्थितीत आराधनेचा कार्यक्रम व लिंग दर्शन हजारो भक्तांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी सर्व महाराजांच्या शिष्यांनी महाराजांचे दर्शन घेवुन महाप्रसादाचा लाभ घेतला. या पुण्यतिथी कार्यक्रमास माजलगाव शहरातील तीन ते चार हजार भक्तवर्ग उपस्थित होता. या कार्यक्रमासाठी माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, भाजपा नेते मोहन जगताप, कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, माजी सभापती नितीन नाईकनवरे, युवा नेते जयसिंह सोळंके, भाजपा तालुकाध्यक्ष अरूण राउत, अभय होके पाटील, नगरसेवक शरद यादव, राहुल लंगडे, माजी तालुकाध्यक्ष हनुमान कदम, अॅड. भानुदास डक, ईश्वर खुर्पे, बाळासाहेब क्षिरसागर, सरपंच भारत साबळे यांचेसह विवीध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पुण्यतिथीनिमीत्त महाप्रसादाचे आयोजन विश्वंभर नाथ्रेकर यांनी केले होते तर आराधना अन्नदान पांडुरंग देशपांडे तालखेडकर यांनी केले होते. मठावर सायं. पाच वाजता प्रदोष पुजा माधवानंद महाराजांच्या उपस्थितीत करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समितीचे संतोष कोथाळकर, अंबुतात्या देशमुख, कुमार मुळी, सतिष जोशी तालखेडकर, ए. पी. कुलकर्णी, सुरेंद्र जोशी, आनंतशास्त्री जोशी, बी.एन. कुलकर्णी, कमलेश जाब्रस, दत्ता काळे, राजेंद्र भिलेगावकर, भालचंद्र पाठक, उमेश मोगरेकर, सचिन देशमुख, राजु पत्की, संतोष काटकर, गोपाळ कुलकर्णी, नंदकुमार हुंडे, बप्पा देशमुख, सुधाकर देशमुख, धनंजय माने, मठाचे पुजारी भगवान लंके यांचेसह सर्व सदस्य यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनायक रत्नपारखी यांनी केले. सुत्रसंचालन दत्ता महाजन यांनी केले.



# मराठी पत्रकार परिषद वडवणी तालुका शाखेची बैठक संपन्न

वडवणी (प्रतिनिधी)

मराठी पत्रकार परिषद वडवणी तालुका शाखा , डिजिटल मिडिया, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे पदाधिकारी, सदस्य,पत्रकार यांच्या महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन काल दि.८ फेब्रुवारी गुरुवार रोजी परिषद कार्यालयात डिजिटल मीडिया राज्य कार्याध्यक्ष अनिलराव वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.यावेळी संघटना वाढीसाठी व पत्रकार यांच्या हिताच्या विविध विषयावर सविस्तर चर्चा करून ठराव संमत करण्यात आले.



मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख सर यांचे मार्गदर्शनाखाली मराठी पत्रकार परिषद वडवणी तालुका शाखा अत्यंत चांगले काम करत असुन येणाऱ्या काळात हि संघटना वाढीसाठी व पत्रकार यांच्या हिताच्या दृष्टीने काम करण्यासाठी काल दि.८ फेब्रुवारी गुरुवार रोजी दुपारी १२.०० वाजता डिजिटल मिडिया राज्य कार्याध्यक्ष अनिलराव वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली परिषद कार्यालय वडवणी येथे महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले यामध्ये जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंखे यांच्या सुचनेनुसार सन २०२४ ते २०२६ या वर्षाच्या सदस्य नोंदणीचा शुभारंभ करण्यात आला तसेच एस.एम.देशमुख सर यांचे वडील स्व.माणिकराव देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त २६ फेब्रुवारी रोजी देवडी येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्या विषयी हि नियोजन करण्यात आले तसेच विविध पत्रकार यांच्या विषयावर सविस्तर चर्चा करून ठराव संमत करण्यात आले तरी यावेळी बैठकीला मराठी पत्रका परिषदेचे डिजिटल मिडिया राज्य कार्याध्यक्ष अनिलराव वाघमारे, वडवणी तालुका अध्यक्ष अँड विनायक जाधव, माजी अध्यक्ष सुधाकर काका पोटभरे, सचिव सतिषराव सोनवणे, कोषाध्यक्ष शांतिनाथ जैन, संपादक ओमप्रकाश साबळे, पत्रकार महेश राव सदरे, पत्रकार हरिभाऊ पवार, पत्रकार संभाजी लांडे, पत्रकार अर्जुन मुंडे, पत्रकार शंकर झाडे, पत्रकार धम्मपाल डावरे, पत्रकार वाजेद पठाण, पत्रकार अतुल जाधव, उपस्थित होते.



# गेवराईच्या न्यु हायस्कूल शाळेच्या ११ विद्यार्थ्यांचे एनएमएमएस परीक्षेत यश

शेख आतिख/तलवाडा

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे ,यांच्या मार्फत दि.२४ डिसेंबर २०२३ रोजी घेण्यात आलेल्या आर्थिक दुर्बल घटक परीक्षा या मध्ये न्यू हायस्कूल गेवराई या शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघावित यश संपादन केले आहे. सदर परीक्षेमध्ये शाळेतील ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद संचलित न्यू हायस्कूल गेवराई येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे ,यांच्या मार्फत दि.२४ डिसेंबर २०२३ रोजी घेण्यात आलेल्या परिक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे यामध्येबर्गे वैष्णवी, सोलाट सत्यम, डाके सुचिता, औटे अंकिता, महानोर रितेश, खंडागळे यशोधन, मुळे अमृता,जाधव संस्कार,शिंदे प्रणव,प्रधान शुभम, उनवणे कोमल हे ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. शाळेचे मुख्याध्यापक तौर सर, पर्यवेक्षक डांगरे सर, एनएमएमएस परीक्षेचे मार्गदर्शक वायाळ सर, बंडगर सर , श्रीम.कापरे यांच्या सह शालेय समिती सदस्य व शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे पुषगुच्छ देवून केले अभिनंदन केले.



# भोगलवाडी येथील लक्ष्मीआई यात्रेनिमित्त भाजपा निवडणूक प्रमुख मोहनराव जगताप यांच्या हस्ते जंगी कुस्त्यांचे उद्घाटन

धारूर (प्रतिनिधी)

धारूर तालुक्यातील सर्वात मोठे असलेले जिल्हा परिषद सर्कल म्हणजे भोगलवाडी या गावच्या श्रीलक्ष्मीआई देवीची आज यात्रा होती. या यात्रेमध्ये दरवर्षीप्रमाणे जंगी कुस्तीचा कार्यक्रम आयोजित केला जातो . या कुस्त्यांचे उद्घाटन भारतीय जनता पार्टीचे माजलगाव विधानसभा निवडणूक प्रमुख तथा छत्रपती कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहनराव जगताप यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी जिल्हाभरातून मोठ्या संख्येने पैलवान उपस्थित होते.दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री लक्ष्मी मातेच्या यात्रेनिमित्त धारूर तालुक्यासह जिल्हाभरातून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात. आज या कुस्त्याच्या कार्यक्रमानिमित्त एक प्रकारे मोहनराव जगताप हे निवडणुकीच्या फडात उतरले असे चित्र दिसत आहे सध्या मोहनराव जगताप हे मतदार संघातील सुखदुःखाच्या ठिकाणी तसेच सार्वजनिक कार्यक्रम जयंती उत्सव यासारख्या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित असतात.

# नराधम बापाचा पोटच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार धारुर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

धारूर (प्रतिनिधी)

अंबाजोगाई तालुक्यात बापाच्या नावाला काळीमा फासणारी घटना घडली आहे. ४१ वर्षीय पित्याने दारू पिऊन,मारहाण करत पोटच्या लेकीवर अत्याचार केला, त्यात मुलगी आठ महिन्याची गर्भवती राहिली आहे. पोटात दुखायला लागल्यानंतर आईने रुग्णालयात नेले असता मुलीने आपबिती सांगितली. मुलीच्या फिर्यादीवरून धारूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद झाला असून पोलिसांनी नराधम बापाला अटक केली आहे धारूर पोलीस स्टेशन हद्दीतील पिडीत मुलीचे कुटुंब ऊसतोडणीचे काम करते. यावर्षी रांजणी कारखान्याला हे कुटुंब ऊसतोड कामगार म्हणून गेले आहे. तेथे काम करत असताना मुलीच्या अचानक पोटात दुखू लागल्याने तिने आईला सांगितले. आईने तिला अंबाजोगाई येथे ६ फेब्रुवारी रोजी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर मुलगी गर्भवती असल्याच सांगितलं. अधिक चौकशी केल्यानंतर मुलीने वडिलांनीच मागील आठ महिन्यांपूर्वी घरी आई बाहेर गेल्यानंतर दारू पिऊन, मारहाण करत अत्याचार केल्याची आपबिती सांगितली. मुलीच्या फिर्यादीवरून नराधम वडीलावर गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली चिडीमार पथकाचे पोलीस उपनिरीक्षक शेळके करत आहेत.



**मुकनायक/दर्पण दिनानिमित्त गुरूवार दि.०८ फेब्रुवारी रोजी गेवराई याठिकाणी जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन केले होते. यावेळी पत्रकार बापू गाडेकर यांना मुकनायक हा पुरस्कार देताना गेवराईचे तहसिलदार संदिप खोमणे, उपविभागीय पोलिस अधिकारी नीरज राजगुरू, माजीमंत्री बदामराव पंडित, नायब तहसिलदार संजय सोनवणे, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक शिवाजीराव सोलाट सर, उद्योजक संजय काळे, यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.**



# आधुनिक महिलांसाठी रमाई एक संस्कार आहे -मायाताई दिवान यांचे प्रतिपादन

बीड (प्रतिनिधी)

त्यागमुर्ती माता रमाई आंबेडकर यांचे जिवनकार्य अनमोल आहे.आयुष्यभर अत्यंत हलाखीचे जिवन माता रमाईने काढले.मायेच्या ममत्वाला व पित्याच्या वात्सल्याला अगदी बालवयात रमाईला मुकावं लागलं.परंतु रमाईने प्रत्येक परिस्थितीला तोंड देत ताकदिनीशी झुंजत राहिल्या.असे असताना देखील तिने तिच्या कर्तव्याशी कधीही तडजोड केली नाही.त्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठिशी खंबीरपणे उभ्या राहिल्या .आधुनिक महिलासाठी रमाई हा एक संस्कार आहे असे प्रतिपादन मायाताई दिवान यांनी आपल्या व्याख्याना प्रसंगी केले.

प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीड व माता रमाई जयंती उत्सव समितीच्या वतीने माता रमाई आंबेडकर यांची १२६ वा जयंती उत्सव निमित्ताने महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर मौजे शिवणी येथे.विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी प्रमुख व्याख्यात्या म्हणुन मायाताई दिवान बोलत होत्या.या कार्यक्रमाच्याअध्यक्ष स्थानी प्रो.डॉ.जयश्री शिंदे यांची उपस्थिती होती तर प्रमुख अतिथी म्हणून मीनाक्षी देवकते यांची उपस्थिती होती.

# राक्षसभुवन येथे रमाई जयंती निमित्त स्पर्धांचे अयोजन करुन प्रमाणपत्राचे वाटप

## त्यागमूर्ती माता रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक

उमापुर/ प्रतिनिधी

तालुक्यातील राक्षसभुवन येथे त्यागमूर्ती माता रमाई जयंती जयंती निमित्त रांगोळी, भाषण, चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्याप्रमाणात आपला सहभाग नोंदवला होता. स्पर्धांचा निकाल तात्काळ लावुन स्पर्धेमध्ये ज्यांनी सहभाग नोंदवला होता त्यांना बक्षीस व प्रमाणपत्राचे वाटप मान्यवर वंचितचे नेते विष्णु देवकते, गेवराई तालुका अध्यक्ष पप्पु गायकवाड, बीड तालुका अध्यक्ष किरण वाघमारे, वंचितच्या नेत्या मनिषा शरणांगत, सुभाष पोटफोडे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. सकाळी ११ वाजता प्रथमता त्यागमूर्ती माता रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आली व सायंकाळी माता रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची वाजतगाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली यावेळी



राहुल पोटफोडे,विनोद पोटफोडे, निखील पोटफोडे, एकनाथ पोटफोडे, शनी पोटफोडे, बाबासाहेब पोटफोडे, अनंद पोटफोडे, रामभाऊ पोटफोडे, पांडू पोटफोडे, सुमीत पोटफोडे, अक्षय पोटफोडे, अदित्य पोटफोडे, ताराचंद जोगदंड,विलास पोटफोडे, रवी मोटे, अनंता मोटे, विनोद घायतडक, अमोल तायडे, राजू पोटफोडे, राजु जोगदंडसह शेकडो महिला उपस्थित होत्या.

# भारतीय बौध्द महासभा शाखा बीड च्या वतीने माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

दी.०७/०२/२०२४ रोजी बीड शहरात तमाम भारतीय बौध्द अनुयायांची एकमात्र धार्मिक संस्था भारतीय बौध्द महासभा शाखा बीड च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथुन बीड शहरातून भव्य प्रभातफेरी काढण्यात आली, नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला देखील पुष्पहार अर्पण करण्यात आला.बीड शहरातून जमलेल्या जनसमुदायासोबत सामुदायिक त्रिशरण पंचशील ग्रहण करून त्याठिकाणी आयु.मायाताई दिवाण यांचे अतिशय मार्मिक असे माता रमाई यांच्या जीवनावर व्याख्यान संपन्न झाले.याप्रसंगी भारतीय बौध्द महासभा शाखा बीड जिल्हा अध्यक्ष आयु. महालिंग निकाळजे,सरचिटणीस आयु. सिद्धार्थ जगझाप,संरक्षण उपाध्यक्ष कॅप्टन राजाभाऊ आठवले, तालुका अध्यक्ष




आयु.यशवंत कदम, ता.सरचिटणीस आयु.संदेश डोळस,बीड शहर सरचिटणीस ऍड.केतन गायकवाड, तसेच महासभेचे पदाधिकारी आयु.अनिल डोळस,आयु.राजेंद्र ससाणे,आयु.संतराम शिंदे,आयु.सोनवणे साहेब,आयु.हनुमंत कांबळे,तसेच महिला पदाधिकारी आयु. पद्मिनीताई गायकवाड,आयु.वासनिक ताई,आयु.साळवी ताई, आयु.जाधव ताई,आयु.आठवले ताई, व भारतीय बौध्द महासभा शाखा बीड शहर,तालुका,जिल्हा सर्व पदाधिकारी सभासद हे उपस्थित होते.

# रामकथेचा समारोप !

# झाले रामराज्य काय उणे आम्हासी !

## कपाळी टिळा ,धर्माबद्दल जिव्हाळा व आई वडीलांना सांभाळा

शिरूरकासार ।प्रतिनिधी

नगरपंचायत ,भाजपा आयोजीत रामकथेचा मंगळवारी मोठ्या उत्साहात समारोप झाला ,रामजन्मापासून रामराज्याभिषेक संगित तुलशीरामायणातून साध्वी अनुराधादिदीने शिरूर सृष्टी राममय झाली होती . महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे उपस्थितीत झाले रामराज्य काय उणे आम्हासी असा हा सोहळा संपन्न झाला ,कथा मंडप भगव्या पताकांनी सजला होता ,महिलांनी देखील दिदींच्या आदेशानुसार भगवी पस्त्र परिधान केले होते ,राज्याभिषेकानंतर फटाक्यांची आतषबाजी झाली ,साध्वी ,महंत . संगित कलाकारांचा व उपस्थित मान्यवरांचा नगरपंचायतकडून सत्कार करण्यात आला .राम जन्मापासुन ते गुरूदिक्षा ,वनवास,अहिल्या उध्दार ,सिता स्वयंवर , सितेचे अपहरण ,कुंभकर्ण रावण वधानंतर अयोध्देत पुनरागमन होऊन राज्याभिषेक असा आनंद रामभक्तांनी अनुभवला .




समारोपप्रसंगी साध्वी अनुराधा दिदीने मतलब ,लालच और दाम म्हणजे पैसा या तीन गोष्टी मैत्रीला मोठ्या बाधक ठरतात ,कपाळावर टिळा ,धर्माबद्दल जिव्हाळा आणि आई वडीलांना सांभाळा असा मौलीक सल्ला देऊन समुद्रावर सितेसाठी पुल बांधणे सर्वात मोठी प्रेमाची साक्ष ठरते ,स:खा भाऊ रावणासोबत राहिला नाही तर वनवासात सुध्दा रामाचा भाऊ लक्ष्मणाने साथ सोडली नाही म्हणून तर बलशाली असुन देखील रावणाला पराभुत होऊन मरावे लागले असे सांगुन बंधूप्रेमाचे महत्व सांगितले.कथेच्या समारोपाला आष्टीवरून सौ.ऐश्वर्या धस , माजलगाववरून शरद भांडेकर ,बीडवरून रोकडे ,शेवगाववरून सुनिल रासणे आदि मान्यवर उपस्थित होते.पांच दिवस भाविकांनी मोठ्या संखेने उपस्थित राहून कथासारामृत सेवन केले .

# चाटे स्कूल मध्ये स्नेहसंमेलन उत्साहात

# विद्यार्थी कलाकारांच्या सादरीरणावर प्रेक्षकांनी धरला ठेका

केज ।प्रतिनिधी

शहरातील समर्थनगर भागातील चाटे स्कुल मध्ये मंगळवार रोजी वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. कार्यक्रमास जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर, डॉ नितीन चाटे,उपसभापती वासुदेव नेहरकर,डॉ दिनकर राऊत,शिवाजी ठोंबरे,दिनकर चाटे,भगवान चाटे,रामधन चाटे,अजय चाटे,राजेभाऊ चाटे, अंनिस चे हनुमंत भोसले,रामदास साबळे,संतोष गालफाडे, दुर्गादास लांब,गौतम बचुटे,रामदास तपसे , डॉ हनुमंत सौदागर,

अर्शद शेख,मुबशीर शेख, दिनकर चाटे,सदाशिव चाटे बाळासाहेब गाढवे, संस्थेचे सचिव शिवाजी चाटे आदींची उपस्थिती होती .यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मराठी,हिंदी,विविध गीतांवर ठेका धरत प्रेक्षकांची मने जिंकली. सोशल मीडिया च्या अतिवापराचे दुष्परिणाम,अंधश्रद्धा निर्मूलन ,पर्यावरण ,देशभक्ती आदी विषयावर नाट्य,गीत सादर केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रास्तविक शिवाजी चाटे यांनी केले.यावेळी उत्कृष्ट अध्यापन याबद्दल आदर्श शिक्षक पोखरकर सोनाली,विद्या बडे,रत्नमाला



क्षीरसागर यांचा रोख रक्कम व सन्मानचिन्ह ,प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी हनुमंत भोसले म्हणाले,कला क्रीडा संगीत या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो असे मत व्यक्त केले. नंदकिशोर मुंदडा यांनी बोलतांना चाटे स्कुल च्या रोपातून वटवृक्ष उभा राहत आहे.विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर कमी करून मैदानी खेळ खेळावेत असे मत व्यक्त केले. स्नेहसंमेलन कार्यक्रमास पालक ,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक गोरखनाथ बडे यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.



**आज मौजे भंडारवाडी येथील मेडची देवी यात्रे निमित्त जंगी कुस्त्यांच्यां कार्यक्रम भंडारवाडी येथे संपन्न झाला. याप्रसंगी बाजीराव चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली पै . अक्षय सालगुडे विजयी मल्ल याना मानाची चांदीची गदा बाजीराव चव्हाण याच्या हस्ते देण्यात आली.भंडारवाडी हे गाव कुस्त्यांसाठी प्रसिद्ध असल्यामुळे महाराष्ट्र नामांकित मल्लांची येथे दर्शनीय उपस्थिती होती.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बाजीराव चव्हाण यांचे स्वागत धर्मवीर प्रतिष्ठान सदस्य व ग्रामपंचायत सदस्य काशिनाथ जाधव,सरपंच लालासाहेब सालगुडे,यांनी केले याप्रसंगी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख महादेव नाना मातकर, डॉ.ज्ञानेश्वर जाधव, निखिल मस्के,पै.कृष्णा नागवे,काकडे साहेब,उद्धव मडके,यांचाही सत्कार गावातील नागरिकांनी केला याप्रसंगी भंडारवाडीतील सर्जेराव गमे, राहुल गमे, मच्छिंद्र सालगुडे, सचिन सालगुडे,उमेश जाधव,अजय सालगु,विलास जाधव,अमोल सालपे, सुजित सालगुडे,दादा गमे, बळीराम जाधव, हनुमान सालगुडे,बापु गोकुळे, बाबासाहेब सालपे, पांडुरंग सालगुडे,रामहारी सालगुडे,विशाल जुळे,बापु जुळे,अतुल सालगुडे, महादेव सालगुडे,आंगद जाधव,विकास जाधव,बाबु जाधव,स्वामी सालगुडे,व सर्व गावकऱ्यांनी हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.आकाश जाधव, सचिन जाधव, प्रणव सालगुडे,संग्राम सालगुडे,तुकाराम सालगुडे,महादेव जाधव,गमे ज्ञानेश्वर, वाल्मीक सिगण, रणजीत जाधव, अजय जाधव, विलास जुळे, काशिनाथ, लगुडे, खंडेराव सालगुडे, मुकुंदा सालगुडे, सोनामथ सालगुडे, बाबा साहेब पै.अक्षय सालगुडे, दिपक गमे,**

## पैठ बीड एकता नगर,मध्ये त्यागमूर्ती माता रमाई जयंती साजरी

# प्रत्येक स्त्रीने रमाईचे गुण अंगिकारले पाहिजे... मायाताई मिसळे

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील एकता नगर भागात दिनांक ०७ फेब्रुवारी रोजी माता रमाई ची १२६वी जयंती रमाई च्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करन्यात आले.एकता नगर भागातील महिलांनी मोठया उत्साही,आनंदी वातावरणात जयंती साजरी करण्यात आली.अवघ्या वयाच्या नवव्या वर्षी रमाईचा विवाह झाला होता माता रमाई केवळ ३७ वर्ष जीवन लाभले या ३७ वर्षात त्याना खूप कष्ट,संघर्ष,त्याग त्यांना करावा लागला.यावेळी माता रमाई च्या जीवनावर प्रकाश टाकण्यात आला

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनच्या शिक्षणात व संसारात माता रमाई चा सिंहाचा वाटा आहे.प्रत्येक स्त्रीने हें गुण अंगिकारले पाहिजे.असे मत मायाताई मिसळे यांनी व्यक्त केले. स्वतःच्या सुखाचं व संसाराचा विचार न करता रमाई ने सुखाचा त्याग करत बाबासाहेब आंबेडकरांना खंबीरपणे साथ लाभल्यानेच आंबेडकराना दिन दलित,उपेक्षिताच्या न्याय व हक्कासाठी लढता आले व दिन दलितांना न्याय देता आला.रमाईच्या त्यागामुळे बाबासाहेबाच्या शिक्षणाला एक दिशाच मिळाली.



रमाई ने बाबासाहेबाच्या समाजकार्यात समर्थपणे,खंबीरपणे साथ दिली कधी कशाचीच अपेक्षा न करता फक्त बाबासाहेबाचे शिक्षण व समाजकार्यात सोबत राहिल्यामुळेचा शिक्षण व समाजकार्य पूर्ण झाले.माता रमाई ने जीवनात खूप संघर्ष केला परंतु बिकट परस्थिती असताना देखील आपल्या संसाराचा गाडा पुढे घेऊन गेल्या.डॉ.आंबेडकरांना शिक्षण पूर्ण व्हावे म्हणून त्यानी खूप कष्ट करून पैसा शिक्षणासाठी दिला.देशातील कोट्यावधि माता भगिनीसाठी माता रमाई चा जीवनप्रवास आदर्श,संघर्ष,बलिदान,त्याग प्रेरणादायी आहे.त्यामुळे त्याना त्यागमूर्ती असे म्हणतात.रमाई च्या शिवाय आंबेडकरांचे पुर्णत्व नाही. आज जगाच्या पाठीवर जोपर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे नाव आहे तोपर्यंत रमाई नाव,त्याग व कार्य अजरामर राहील. यावेळी रेशमा जोगदंड,मनीषा साळवे, संगीत जाधव,जमून काळे,माया कोरडे ,सविता ससाणे,माया वाघमारे,निशा जावळे,पूजा परदेशी,अनुषया कोरडे ,ललिता कपाळे,विमल यादव,मंगल वाघमारे ,मंगळ जाधव ,पार्वती वारेकर,निशा जावले,प्रियांका यादव,शोभा डोंगरे,पाखरे बाई ,अलका सोनवणे,यांनी उपस्थित राहून माता रमाई ला अभिवादन केले.

# १० लाखासाठी दत्ता खेत्रे यांनी केला पत्नीचा छळ

राज्य राखीव दल ग्रुप नं .०२ मधील कर्मचारी दत्ता सुरेश खेत्रे बक्कल नं .२०१७/ १७६ यांनी पत्नीचा छेळ करत प्लॉट घेण्याकरीता १० लाख रू ची मागणी केली आसता त्या मागणीची पुर्तता फिर्यादीच्या घरच्याकडून न झाल्याने पत्नी नांदवण्यास तयार नसल्याने .. दत्ता सुरेश खेत्रे व त्यांच्या आईवडिलावर माजलगाव पोलिस स्टेशनला ४९८ प्रमाणे गुन्हा नोंद ... प्रतिनिधी .. विश्वनाथ शरणांगत यांच्या कडू .. गेवराई तालुक्यातील वाहेगाव आंम्ला येथील रहिवाशी दत्ता सुरेश खेत्रे हे पुणे येथे राज्य राखीव दल ग्रुप नं .०२ ला हाडपस्यर या ठिकाणी नौकरी करत आहेत ... त्यांची पत्नी स्वेता दत्ता खेत्रे या दामपत्यांना २ वर्षाचा मुलगा आहे .. .. तीन वर्षापुर्वी लग्न झालेले .. स्वेता ला सासु सासरे व नं नंद आहे .. स्वेताचे पती ना मे दत्ता हे तीन महिन्या नंतर बाहेर गावी गडचिरोळी येथे द्विवटीला जात आसत .. त्यामुळे स्वेता हि साररी राघ्याची .. सासरे सुरेश यांना दारूचे वेशन आसल्यामुळे दररोज संध्याकाळी सासरे .. स्वे तास मानशी क ... त्रास देणे सुरू करायचे .. नंतर नंतर ... वात्रट भाषया करू लागले .. कांही दिवसानंतर स्वेता ने पती दत्ता खेत्रे यांना कल्पना दिली तरी ही दत्ताने कुठलीच विचारणा वडिलास केली नाही .. नंतर स्वे तास पुणे येथे राहण्या करीता घेऊन गेले परंतु सासरा तेथे पण येऊ लागला ... पुणे येथे दत्ताची बहिण आहे नंतर पुन्हा नवरा बाहेर गावी द्विवटीला गेल्या वर सासरे व नं नंद हे दोघे मिळुन पुन्हा स्वेता चा छेळ करणे सुरू केले . नवरा परत पुणे येथे आल्यावर सासु सासरे नंदन व नवरा या सर्वांनी एक विचार केला .. व स्वेता स मारहान करणे मानसीक छेळ करणे सुरू केले .. नंतर दत्ता म्हणे की स्वेता च्या वडिला कडून १० लाख रूपये घेऊन ये प्लॉट घेण्या करीता .. नसता मी तुला नांदवणार नाही आसे म्हणत स्वेवतास माहेरी आणुन घातले .. एक बर्ष पुर्ण झाले तरी नांदवण्यास नेत नाहीत १० लाख रूपये दिले तरच नांदवण्यास नेतो आसे दत्ताचे म्हणणे होते . स्वेता चे वडिल मोलमजुरी करून खात आसल्याने इतकी रक्कम नाही देऊ शकत म्हणुन .. कांहीतरी तडजोड होईल म्हणुन महिला तक्रार बीड मध्ये नोंद केली .. स्वेता ने केली परंतु दत्ता व त्याचे वडिल हे नांदवण्यास तयार नसल्याने माजलगाव येथे पोलिस स्टेशन मध्ये गु .कलम .४९८ /३२३/५०४/ ५०६/३४प्रमाणे दत्ता .. व त्याचे वडिल / आई /नं नद यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे .

# जिंतूर तालुक्यातील भूसंपादन प्रकरणी जिल्हाधिकारी व भूसंपादन अधिकाऱ्यांना उच्च न्यायालयाची नोटीस

जिंतूर ।प्रतिनिधी

तालुक्यातील यनोली,वाघी(धा) व हनवतखेडा आदी गावातील शेतजमीनी रोजगार हमी योजने अंतर्गत पाझर तलावांसाठी संपादित करण्यात आल्या होत्या. मात्र मागील अनेक वर्षांपासून जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळाला नाही,त्यातच जिल्हाधिकारी व भूसंपादन अधिकारी मागील दोन वर्षांपासून वेगवेगळी कारणे देऊन शेतकऱ्यांची अडवणूक करत आहेत.त्यामुळे यनोली,वाघी, हनवतखेडा गावातील शेतकऱ्यांनी उच्च न्यायालयात धाव घेऊन याचिका दाखल केली होती.यावेळी माननीय उच्च न्यायालयाने सुनावणी अंती दिनांक.३१ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी,भूसंपादन अधिकारी व इतर अधिकाऱ्यांना नोटीस जारी केल्या आहेत.

जिंतूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमीनी लघुसिंचन जलसंधारण विभाग जालना कार्यालयाने जुन्या रोजगार हमी योजने अंतर्गत पाझर तलावासाठी सण २००७- २००८ मध्ये संपादित करून, तडजोड पत्रावर सह्या घेऊन जमिनी ताब्यात घेण्यात आल्या होत्या. सदरील तडजोड पत्रामध्ये स्पष्ट नमूद करण्यात आले होते की,जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेतल्यापासून भूसंपादन कायद्यातील तरतुदीनुसार जमिनीचा ठरलेल्या किंमतीवर दरसाल दर सेकडा ६ टक्के दराने भाडे देण्यात येईल व भाडे भरपाईची अंतिम रक्कम ठरवे पर्यंत ४ टक्के रक्कम तात्पुरते भाडे देण्यात येईल.मात्र २००७ - २००८ जमिनी ताब्यात घेऊन कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देण्यात आली नाही. जिल्हाधिकारी यांनी मागील दोन वर्षांपासून जवळपास चार वेळेस स्थळ पाहणी करण्याचे आदेश दिले आहेत यावेळी पंचा समक्ष स्थळ पाहणी करण्यात आलेली आहे.तरीही अद्याप पर्यंत अंतिम निवाडा पारीत करून शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला दिलेला नाही तसेच नियमानुसार निवाडा पास होण्याच्या अगोदर दिले जाणारे भूभाडे सुद्धा अद्याप पर्यंत देण्यात आलेले नाही याबाबत शेतकऱ्यांनी वेळोवेळी भूसंपादन अधिकारी,जिल्हाधिकार्यांना भूभाडे व जमिनीचा मोबदला मिळण्या संदर्भात वेळोवेळी अर्ज लिहून विनंती केली होती,परंतु त्यांनी सादर केलेल्या अर्जाची भूसंपादन अधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांनी कोणतीच दखल घेतली नाही म्हणून उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंड पिठात अँड युवराज बारहाते यांच्या मार्फत शेतकऱ्यांनी रिट याचिका दाखल केली होती. सदरील याचिकेवर सुनावणी अंती प्रतिवादीना नोटीस जारी करण्याचे आदेश दिले असून दिनांक. ४ मार्च रोजी पुढील सुनावणी ठेवण्यात आली आहे. या याचिकेत एक महिण्यात भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करून मोबदला द्या,तसेच ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामूळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे त्याची भरपाई संबंधीतांकडून वसूल करण्यात यावी व दोषी अधिकारी व कर्मचारी यांची विभागीय चौकशी करून कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे या प्रकरणी अँड युवराज बारहाते शेतकऱ्यांच्या वतीने बाजू मांडत आहेत.



संपादीत जमीन कमी केल्या प्रकरणीही उच्च न्यायालयाची नोटीस

जिंतूर तालुक्यातील सावरगाव व सेलू तालुक्यातील राव्हा येथील शेतकऱ्याची पाझर तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना पूर्व कल्पना न देता परस्पर खोदकाम झालेल्या जमिनीवर पाणी साठा होत नसल्याचे कारण देऊन क्षेत्रफळ कमी केले होते यामुळे खोदकाम झालेल्या जमिनीत कोतेही पिके घेता येत नाहीत म्हणून आर्थिक नुकसान झाले होते यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी अँड युवराज बारहाते यांच्या मार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती या प्रकरणीही न्यायालयाने नोटीस जारी केली असून एक महिन्यात उत्तर दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत

या शेतकऱ्यांच्या जमिनी केल्या कमी

राव्हा पाझर तलावातील शेतकरी भोजा शंकर देवकते ०.१६ आर,सुशिलाबाई त्रंबकराव ०.११ आर व रामा गंगाधर ०.२६ आर जमीन कमी करण्यात आली आहे तर सावरगाव येथील गंगाधर महादेव लिखे यांच्या कुटुंबातील ५० आर जमीन कमी करण्यात आली आहे.माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार एखाद्या जमिनीचे भूसंपादन करून ताबा घेतला गेला असेल तर सदरील जमिनीची भूसंपादन प्रक्रिया रद्द करता येत नाही सदरील प्रकरणात १५ वर्षांपूर्वी ताबा घेऊन काम पूर्ण केले आहे.-- अँड युवराज बारहाते उच्च न्यायालय खंडपीठ संभाजीनगर

दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे



## दिंद्रुड च्या जि. प. केंद्रीय व प्राथमिक शाळेत आनंदनगरी बाल गोपाळांच्या खाऊ विक्रीत हजारोंची उलाढाल

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड च्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक (कन्या) व जि.प. प्रा. (मुलांची) शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आनंदनगरीचे आयोजन (दि ७) बुधवारी सकाळी १०.३० वाजता करण्यात आले होते. खाऊ विक्रीतून विद्यार्थ्यांनी हजारोंची उलाढाल याप्रसंगी केली. त्याचप्रमाणे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले तसेच माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करुन महिलांसाठी स्नेह भेट व हळदी कुंकवाचा कार्यक्रम दोन्ही शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

दिंद्रुड चे सरपंच अजय कोमटवार, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दादासाहेब वकरे, शिवहार कटारे यांनी फित कापत, श्रीफळ वाढवून या आनंदनगरीचे उद्घाटन केले. यावेळी व्य. समितीचे उपाध्यक्ष संतोष ठोंबरे, विलास सोनटक्के व सर्व समिती सदस्य नारायण चांदबोधले, सुज्ञ पालक, नागरिक, पत्रकार संतोष स्वामी, अमोल ठोंबरे, नवनाथ कांबळे, गणेश काटकर, बाबा देशमाने आदि मान्यवर उपस्थित होते.

शिक्षणाबरोबरच व्यवहार चातुर्य व पाक कौशल्य संपादित करण्यासाठी येथील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन बनवलेल्या खाऊच्या विक्रीचे स्टॉल आनंद नगरीत लावले होते. आनंदनगरीत चिमुकल्या मुला-मुलांनी आपापल्या घरी मेहनत करून मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत भाजीपाला, मटकीची उसळ, भेळ, पाणीपुरी, पोहे, इडली, ठोकळे, अप्पे, गुलाबजामुन, समोसे, वडापाव,भेळ, मसाला पापड आदि स्वादिष्ट व चवीची मेजवानी उपस्थित पालक व ग्रामस्थांसाठी उपलब्ध करून दिल्यामुळे सर्वांनी मनमुराद खाऊं चा आस्वाद घेत बालकांना भरभरून प्रतिसाद दिला.

विशेषत: या आनंदनगरीत गावातील शिक्षणप्रेमी, माता-पालकांची संख्या लक्षणीय होती. शेकडो विद्यार्थ्यांनी या प्रसंगी सहभाग नोंदवत खाऊ विविध वस्तुंची विक्री केली. त्याचप्रमाणे विविध स्पर्धेचे खेळ घेत दिंद्रुड ग्रामस्थांना तृप्त व मनमोहीत केले. केंद्रीय मुख्याध्यापक वचिष्ठ मुंडे, मुख्याध्यापक मंचक सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली सहशिक्षक पिराजी वानोळे, महादेव कटारे, प्रमोद कोल्हे, रामकिसन चाटे, नवनाथ दुधाळ, पांडुरंग वाकसे, सिध्देश्वर बोकन, सहशिक्षिका प्रगती देशपांडे, सारिका फुलमाळी, राधिका गडदे, मिरा फपाळ यांनी विद्यार्थ्यांना स्टॉल लावण्यास व चिमुकल्यांना मदत केली.



शाळेतील आनंदनगरीच्या उद्घाटन प्रसंगी पत्रकार परिषद, अंबाजोगाई आयोजित दर्पण व मूक नायक दिनाच्या औचित्याने देण्यात आलेला सन २०२४ चा सहकार महर्षी स्व. दत्तात्रय शिंदे स्मृती पत्रकारिता पुरस्कार दिंद्रुड चे लोकमत प्रतिनिधी संतोष बाबुराव स्वामी यांना मिळाल्याने शाळा व ग्रामस्थांच्या वतीने यावेळी त्यांचा सन्मान करण्यात आला.

महिला पालकांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम -मकर संक्रांतीचे औचित्य साधत येथील दोन्ही जि.प.कें.प्रा. शाळेतील माता-पालकांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम याप्रसंगी संपन्न झाला. महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी मार्गदर्शनपर चर्चासत्र याप्रसंगी आयोजित करण्यात आले होते. महिला बचत गटाचे महत्व याप्रसंगी शिक्षकवृंदांनी गावातील आलेल्या उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.

## चिंचाळ्यात डेंग्यूचे रुग्ण सापडल्याने नागरिकांत भीत

संभाजी लांडे ।वडवणी

वडवणी तालुक्यातील चिंचाळा येथे गेल्या आठ दिवसांत डेंग्यूचे दोन रुग्ण पॉझिटिव्ह आढळले असून यामुळे चिंचाळा आणि परिसरातील नागरिकात भीतीचे वातावरण असून आरोग्य विभागाने लवकरात लवकर उपाययोजना कराव्यात अशी मागणी गावकऱ्यांच्या वतीने होत आहे. वातावरणातील बदलाने नागरिक हैराण झाले असुन लहान मुलात सर्दी खोकला ताप याचे प्रमाण वाढत असल्याने लहान मुलांच्या रुग्णांत झपाट्याने वाढत आहेत घरातील मोठ्या सह लहान मुलं ही आजाराने बेजार होत आहेत

चिंचाळा गावातील १६ वर्षाच्या मुलाला ताप येत आसल्याने वडवणी



येथील संस्कार रुग्णालयात दाखल करण्यात आले होते येथे तपासणी करण्यात आल्यावर डेंग्यू पॉझिटिव्ह असल्याचे आढळले तसेच एका ११ वर्षाची मुलगी ही डेंग्यू पॉझिटिव्ह आढळल्याने तिच्यावर बीड येथील खाजगी रुग्णालयात उपचार चालु असुन चिंचाळा गावात डेंग्यू च्या आजाराने डोके वर काढले आहे परंतु आरोग्य विभागाकडून चिंचाळा गावात कुठल्याच उपाय योजना होत नसल्याने अनखीन डेंग्यू च्या रुग्णात वाढ होण्याची शक्यता आहे.

रुग्ण मिळाल्याची माहिती आरोग्य विभागालाच नाही

चिंचाळा येथे डेंग्यूचे रुग्ण निघाले असल्याची माहिती आरोग्य विभागाला च नसल्याने गेल्या आठ-दहा दिवसांपासून आरोग्य विभागाने या ठिकाणी कोणत्याच उपाययोजना केल्या नाहीत.आज जेव्हा या संदर्भात कुप्पा येथील आरोग्य अधिकारी यांना यासंदर्भात विचारले असता त्यांनी माहिती नसल्याचे सांगताच लवकरच येते उपाययोजना करण्यात येतील असे सांगितले.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचा समारोप

माजलगाव (प्रतिनिधी)

सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष शिबिराचा समारोप समारंभ दि.०७ फेब्रुवारी रोजी मौजे रामपिंपळगाव येथे संपन्न झाला. सातदिवशीय शिबिरात दैनंदिन श्रमदानाबरोबरच बालविवाह, पर्यावरण संवर्धन, जलव्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, आधुनिक ग्राम, व्यसनमुक्ती, मतदान जनजागृती, इत्यादी विषयांवर जनजागृती तसेच प्रबोधन करण्यात आले.

शिबिराच्या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.के.सानप होते. प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार कमलेश जाब्रस,सरपंच रामेश्वर चाळक,उपप्राचार्य डॉ एन के मुळे, डॉ एम ए कव्हळे, यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना कमलेश जाब्रस म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून




स्वयंसेवकांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळतो. भारत हा तरुणांचा देश आहे. त्यामुळे, देशाला तरुणांकडून मोठ्या अपेक्षा आहेत. देशाला महासत्ता बनवायचे असेल तर देशातील तरुणांमध्ये कौशल्य विकासाबरोबरच व्यक्तिमत्व विकास होणे तितकेच महत्त्वाचे आहे. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. एन.के. मुळे व डॉ. एम.ए. कव्हळे यांनीही आपल्या भाषणात राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी जीवनातील महत्त्व विषद केले. अध्यक्षीय समारोप करताना डॉ. जी.के.सानप म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गावकऱ्यांच्या सहकार्याने गावातील सर्व घटकांना सोबत घेऊन आदर्श गाव या संकल्पनेला मूर्त स्वरूप देता येते. यावेळी सरपंच रामेश्वर चाळक यांच्यासह स्वयंसेवक अथर्व शेटे, विनय चाळक, व झाशी वजीर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवाल वाचन कार्यक्रमाधिकारी डॉ. नितिन ढवळे यांनी केले.सूत्रसंचलन स्वयंसेवक रामेश्वर मोरे याने तर आभार प्रा. उमेश राठोड यांनी मांनले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे, प्रा.ओमप्रसाद सारगे, प्रा. अरुण पेंटावार, डॉ.सतीश डाके, प्रा. सुदर्शन स्वामी,प्रा. सिद्धेश्वर कदम, प्रा.एम. एस. येवले,प्रा.ज्ञानेश्वर कुडकर यांच्यासह प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी, स्वयंसेवक व गावकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. शिबिराच्या यशस्वीतेसाठी बंडू झोडगे, धिरडे, डिगंबर तौर, परमेश्वर चाळक यांनी परिश्रम घेतले.

## मुस्लीम धर्मगुरू मुफ्ती यांची निर्दोष मुक्तता करा

### सकल मुस्लीम समाजाचे तहसील प्रशासनाला निवेदन

माजलगाव (प्रतिनिधी)

मुस्लीम समाजाचे धर्मगुरू असलेले मुस्लीम सलमान अझहरी हे काही दिवसांपूर्वी संबोधित करत असताना आपल्या भाषणात एका उपमेचा व शेअर शायरीचा वापर करत त्यात त्यांनी कोणत्याही धर्म अथवा समाज अथवा पक्ष किंवा कोणत्याही व्यक्तीचा नामोल्लख न करताही उपमाचा वापर केलेला नाही तरी सुध्दा मुस्लीम समाजाचे धर्मगुरू मुफ्ती यांच्यावर एटीएस पथकाने अटक केली असल्याने माजलगावमध्ये निषेध करत सकल मुस्लीम समाजाने तहसील अधिकाऱ्यांना निवेदन दिले.

याबाबद दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दि. ३१ जानेवारी २०२४ रोजी मुस्लीम समाजाचे धर्मगुरु मुफ्ती सलमान अज़हरी हे समाजाला संबोधीत करीत असतांना आपल्या भाषणात एक उपमेचा वापर करुन व शेरोशायरीचा वापर केला होता. त्यात त्यांनी कोणत्याही धर्म अथवा समाज किंवा पक्ष किंवा कोणत्याही व्यक्तीचा नाम उल्लेख किंवा उपमाचा वापर केलेला नाही. असे असतांना जाणीवपुर्वक मुस्लीम समाजाला भयभीत करण्याच्या हेतुन दि. ३१/ ०१/२०२४ रोजी रात्री गुजरात सरकार यांच्या आदेशाने ए.टी.एस. ने मुफ्ती साहेबांना व आयोजक मोहम्मद युसुफ मलिक, अज़ीम हबीबी वडेदरा यांना बेकायदेशीररीत्या अटक करण्यात आली आहे. आम्ही सर्व निवेदक सर्वात प्रथम गुजरात सरकार, केंद्र सरकार गुजरात ए.टी. एस. महाराष्ट्र ए.टी. एस. व महाराष्ट्र सरकारने या सर्वाचा या बेकायेशीर भयभीत करण्याऱ्या अटकेचा जाहीर निषेध करीत आहोत. व आम्ही सर्वजन सखल मुस्लीम समाज माजलगावच्या

वतीने मा. राष्ट्रपती महोदया यांना विनंतीपुर्वक निवेदन करत आहोत की, देशात भाजपाचे केंद्र सरकार, गुजराज सरकार, महाराष्ट्र सरकार हे देशातील आम्हा मुस्लीम अज्पसंख्याक समाजाला २०२४ च्या निवडणुकीपुर्वी भयभीत करण्याच्या उद्देशाने जाणीवपुर्वक संस्थांचा दुरपर्याग करुन धर्मद्वेषापोटी मुस्लीम धर्मगुरुंना धार्मिक नेते व राजकीय नेत्यांना व मुस्लीम नेत्यांना वेगवेगळ्या




गुन्ह्यात समाविष्ठ करण्याचे कार्य करीत आहे. त्यांच्या या कार्यामुळे कायद्याच्या चौकटीत राहुन कार्य करणारा मुस्लीम समाज दैनंदीत पडताळणीत हातबल झाला आहे. मा. राष्ट्रपती महोदया आपल्या प्रभावाचा व अधिकाराचा वापर करुन मा. मुफ्ती व ईतर सर्वांवर असलेले गुन्हे तात्काळ वापस घेवुन त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात यावे अशा आशयाचे निवेदन सकल मुस्लीम समाजाच्या वतीने माजलगाव तहसीलदारांना देण्यात आले.

## नागरिकांच्या सदृढ आरोग्यासाठी सिव्हीलमध्ये आधुनिक समुपदेशन केंद्र स्थापन

### जिल्हाधिकारी दिपा मुधोळ यांच्या हस्ते केंद्राचे उद्घाटन संपन्न

बीड (प्रतिनिधी)

नागरिकांना व्यसनापासून दूर ठेवत त्यांना व्यसन मुक्त करण्यासाठी काम करण्याचे काम समुपदेशन केंद्राच्या माध्यमातून केले जात आहे. नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी जिल्हा रुग्णालयाच्या ओपीडीत नागरिकांच्या सदृढ आरोग्यासाठी आधुनिक समुपदेशन केंद्र स्थापन करत जिल्हाधिकारी दिपा मुधोळ /मुंडे यांच्याहस्ते गुरूवारी या केंद्राचे उद्घाटन संपन्न झाले.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक बडे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.नागेश चव्हाण, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.लक्ष्मीकांत तांदळे, दंत शल्यचिकित्सक तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ.सत्येंद्र दवडगांवकर, कार्यक्रम समन्वयक ॲग्नेल जॉर्ज, जिल्हा माहिती अधिकारी अंजु कांबळे, वैद्यकीय अधिकारी डॉ.हनुमंत पारखे यांची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम आरोग्य विभाग आणि बजाज इलेक्ट्रकल्स फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा रुग्णालय बीड येथे राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत आधुनिक समुपदेशन केंद्राचा उद्घाटन समारंभ पार पडले. सदरील केंद्र उभारणीकरिता डॉ.मधुरा तळगांवकर मुख्य कार्यकारी अधिकारी बजाज इलेक्ट्रीकल्स फाउंडेशन यांचे आमुलाग्र सहकार्य केले. तसेच जिल्हा रुग्णालयातील डॉ. सय्यद सुमैय्या, डॉ.अभिजीत भालेकर, डॉ.अमोल बनसोडे, डॉ.सबा सय्यद, डॉ.अशोक मते, श्रीमती जयश्री घुंगरड, संतोष हरणमारे, रमेश तांगडे, अभिजीत सारणीकर, नागनाथ भडकुंबे, विशाल जाधव, सुरेश दामोधर, श्रीकांत उजगर, नरसींग राऊत, श्रीमती लोकरे आदी उपस्थित होते.



## भ्रष्ठ महाराष्ट्र शासनाचा धिक्कार करण्यासाठी सुषमा अंधारे माजलगांवात

### शिवसेनेच्या संघर्ष यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - गोरख टाकणखार

माजलगाव (प्रतिनिधी)

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमाताई अंधारे यांच्या प्रमुख उपस्थितीत माजलगावात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले असून मोठ्या संख्येने उपस्थित रहाण्याचे आव्हान शिवसेनेचे माजलगांव तालुका समन्वयक गोरख टाकणखार यांनी केले आहे.



भ्रष्ट महाराष्ट्र शासनाचा धिक्कार करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर शिवसेनेच्या वतीने संघर्ष यात्रेचे आयोजन आहे.त्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात शिवसेनेच्या वाघीन तथा उपनेत्या सुषमाताई अंधारे यांच्या उपस्थितीत जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे या सभेस बीड जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, रत्नाकर शिंदे व उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळंके , राजू महुवाले , ज्ञानेश्वर जाधव , तालुकाप्रमुख प्रभाकर धरपडे , शहर प्रमुख दत्ता रांजण यांच्या नेतृत्वाखाली आज दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ रोजी पात्रुड येथील मनसबदार फंक्शन हॉल येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन गोरख टाकणखार यांनी केले आहे.

## पूरवठा विभागाच्या थेटवाहतूक धोरणांमूळे शासकिय धान्य गोदामातील हमाल हवालदिल

माजलगांव (प्रतिनिधी)

राज्य सरकार कडून राबवण्यात येणा-या वेगवेगळ्या धोरणामुळे दिवसेंदिवस शासकिय धान्य गोदामातील हमाली कामे कमी होत आहेत. खर पाहिल तर हमालांना काम केले तरच मजूरी मिळते. परंतु नव्याने राबवण्यात येणारे हे थेट वाहतूकीचे धोरण जे सरळ सरळ धान्याच्या काळया बाजाराला खुले आम सूट देणारे आहे. त्यामुळे हमालांचा रोजगारही कमी होत असून त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे.

आणी म्हणून पुरवठा विभागाच्या थेटवाहतूक व द्वारपोहच वाहतूक धोरणा संदर्भात काढलेल्या या शासन निर्णयामध्ये ज्या-त्या गोदामातील पूर्वीपासून कार्यरत असलेल्या हमालांकडूनच कामे करून घेणे बाबत शुद्धीपत्र काढण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या शासकिय गोदामातून एक हमाल प्रतिनिधी दिनांक २४ जानेवारी पासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर चालू असलेल्या बेमुदत धरणे आंदोलनात सहभागी झाले आहेत परंतू गेली सोळा दिवसांपासून सुरु असलेल्या उपोषणाला शासन दरबारी प्रतीसाद मिळत नसल्याने हमालांच्या मागण्या शासन दरबारी मांडून त्यांना न्याय मिळवून द्यावा. करिता विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांना निवेदनाद्वारे विनंती करण्यात आली. प्रसंगी माजलगांव मतदार संघातील माजलगांव शासकिय गोदाम , धारूर शासकीय गोदाम , दिंद्रुड शासकिय गोदाम व पूसरा शासकिय गोदाम येथील हमाल दत्तात्रय तौर, दशरथ शिंदे , वैजनाथ शिंदे , पांडूरंग शिंदे , विजय साळवे , ज्योतीराम खामकर , देविदास होले , लक्ष्मण होके , गोविंद होके , राजाभाऊ वाघमारे , महादू धूमाळ ,गणेश आढाव , सुदाम ठोंबरे , अश्रूबा कीचमे, रमेश किचमे, सुरेश किचमे , राजेभाऊ कोरडे, राम पारेकर , बालाजी हरकळ , संजय लोखंडे , बंडू अंकुशे , प्रदीप मुंडे , हनुमंत मुंडे , अमोल अंकुशे , संतोष सोनवणे, नितीन रेपे , शेख मुस्तफा , जयवंत डोईफोडे ' विनोद ढाकणे , शेख सादेक,भागवत तुरे, गणेश तुरे , बाबा मुंडे , राजाभाऊ मुंडे , पिलू म्हात्रे , सुभाष चांदणे इत्यादी शासकीय धान्य गोदाम हमाल उपस्थित होते .

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra).
Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com,
epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com